# 72 Melakarta by Shri Venkatakavi

# श्रीवेङ्कटकविविरचित बाहत्तर मेळकर्ता

## Document Information

Text title : bAhattarameLAkartA

File name : bAhattarameLAkartA.itx

Category : misc, kRitI, marAThI

Location : doc_z_misc_general

Transliterated by : Pallasena Narayanaswami ppnswami gmail.com

Proofread by : Pallasena Narayanaswami, Sunder Hattangadi, NA

Description/comments : from The Samgraha Chudamani Of Govinda Pages 290-326, also see page 46-48 for the list

Latest update : June 14, 2019

Send corrections to : sanskrit at cheerful dot c om

This text is prepared by volunteers and is to be used for personal study and research. The file is not to be copied or reposted without permission, for promotion of any website or individuals or for commercial purpose.

**Please help to maintain respect for volunteer spirit.**

Please note that proofreading is done using Devanagari version and other language/scripts are generated using **sanscript**.

September 16, 2023

*sanskritdocuments.org*

# श्रीवेङ्कटकविविरचित बाहत्तर मेळकर्ता

। आदिताल ।
याचें साहित्य । लावणीध्रुपदसह ।
ध्रुपदा विना मणालयां । मध्यमावती गीती ।
श्रीमान् जो करी राज्य विष्णुसम चव्हानवंशज भूपमणी ।
रघुवर सुकृपाकटाक्षलब्ध त्रिदशाधिपसम विभवधणी ॥

(शुद्धमध्यममेल)
श्रीसमकनकाङ्गी शिवनृपपुत्रीपति विलसे सदरीं ॥ १॥

रत्नाङ्गीसी आंगी लेउनि दिव्यकिरीटहिं लसे शिरीं ॥ २॥

सकलन गानमूर्ति शोभवी धनद विभवि या पृथ्विवरी ॥ ३॥

वनस्पतीची सरस फळें बहु आणुनि ठेविति नजर बरी ॥ ४॥

मानवती हे पाहुनि सर्वहिं करिती श्लाघा परोपरी ॥ ५॥

लसे श्रुती संतानरूपि बहु फळे असे हो निरन्तरी ॥ ६॥

सेनापति हा सिद्धचि पुढती लक्ष देतसे आज्ञेवरी ॥ ७॥

लोकी हनुमतो लीन रामपद पद्मीं अलिसा दिनरात्रीं ॥ ८॥

सवत्सधेनुका सालंकृत हे गजोष्ट्र हय युग हे भारी ॥ ९॥

नाटकप्रिया गणिका ह्या कीं गान करिति बहु सुस्वरीं ॥ १०॥

कोकिलप्रिया पहिली साजे रम्भेहुनी हे सुकुमारी ॥ ११॥

रूपावती ही उर्वशीपरी भरतागम निपुणा दुसरी ॥ १ ॥ ॥ श्री ॥ ॥ १२॥

गायकप्रिया गीती गाती नटनाभिनया दावीती ॥ १३॥

वकुलाभरण शोभति यांसचि पाहुनि जन थक्कित होती ॥ १४॥

करिती मायामाळवगौळाच्च्या ह्या बरव्या हो म्हणती ॥ १५॥
चक्रवाकसम सुस्तनि यांप्रति निरखुनि विटजन मनि भुलती ॥ १६॥
सूर्यकान्त सुमनाने लसविति कर्ण अणिक नग बहुले ती ॥ १७॥
हाटकाम्बरी पैठणि नेसुनी कार्चुबि कञ्चुकि झळकविती ॥ १८॥
मञ्जुळ करझंकारध्वनि बरि परिसा तुम्ही बहु सुज्ञकृती ॥ १९॥
भैरवनट भैरवी हिं ऐकुनि पाहुनि आश्चर्या करिती ॥ २०॥
कीरवाणि कळवांतिणि सुस्वर सताल लययुत ह्या गाती ॥ २१॥
हेचि खरहरप्रियाति गङ्गा शिवशिरिं चढुनी पाहे ती ॥ २२॥
गौरिमनोहरि शिवाङ्गी बसुनी पाहायाशी करि विनती ॥ २३॥
जे कीं वरुणप्रियाही सुखवी हिमनीराच्या मिसें सती ॥ २ ॥ ॥ श्री ॥ ॥ २४॥
माररञ्जनी रति भुलुनि म्हणे अनङ्गपति अनुकूल बरें ॥ २५॥
चारुकेशि हे चामर विझितां होती कङ्कण झणत्कार ॥ २६॥
सरसाङ्गी हे दासी घाली वारा हळुहळु सुखकर ॥ २७॥
हरिकाम्भोजी नाच लक्ष्मिशी बोधिल राहा निरन्तर ॥ २८॥
धीरशङ्कराभरणरूप रघुराजपादयुग दासवर ॥ २९॥
नागानन्दिनीसमा बडोदा महाराणिचा जनक बरें ॥ ३०॥
रिपु पशु यागप्रिया मति हो ज्याची म्हणती जे शूर ॥ ३१॥
स्वसेवकीं अनुरागवर्धनी बुद्धि असे कीं निरन्तर ॥ ३२॥
गाङ्गेयभूषणी भूषित गौरी श्रीच्या सुकृपेसीं पात्र ॥ ३३॥
वागधीश्वरी खेळसे मुखिं जाणतसे पैं षड्शास्त्र ॥ ३४॥
शूलिनी ती परिनीति जयाची मानिति नय विद्राजवर ॥ ३५॥
न होय चञ्चल नाटे दयाम्बुधि मध्यम देशीं हा चतुर ॥ ३ ॥ ॥ श्री ॥ ॥ ३६॥

(प्रतिमध्यममेल)

श्रित सुर सालगा विनृपां प्रति मध्यम उत्तम निवडितसे ॥ ३७॥
जलार्णवचि गम्भीरपणीं जो हेमाद्रिसम धैर्यिं असे ॥ ३८॥

झालवराळी याचें शुभ बहु ऐक सुचरिता म्हणति असें ॥ ३९॥
श्री नवनीतापहारि यदुवर साच कलियुगीं भासतसे ॥ ४०॥
पावनीय श्रीरामकथा श्रद्धेनें प्रतिदिन ऐकतसे ॥ ४१॥
रघुप्रिया दृढ भक्ती ज्याची तेणें इष्टचि साधितसे ॥ ४२॥
स्वीय गवाम्बोधीस चन्द्रसा उल्लासातें देत असे ॥ ४३॥
भवप्रियाळु अणिक कृपाळू यासम हाची वाटतसे ॥ ४४॥
शुभापन्त वराळीसह तू लाभ म्हणती द्विज संतोषें ॥ ४५॥
दाउनि पथ षड्विधमार्गिणि जिंकी रिपुला युक्त दिसे ॥ ४६॥
सुवर्णाङ्गी विजयश्री येउनि माळ घालिते बहु हौसें ॥ ४७॥
दिव्यमणीचा हारही त्यावरी घाली शचीपतिसम भासे । ४ ॥ ॥ श्री ॥ ॥ ४८॥
बहुयशधवलाम्बरीहि व्यापुनी गाजतसे देशोदेशीं ॥ ४९॥
रामनाम नारायणि जपसा जपत असे बहु श्रद्धेशीं ॥ ५०॥
राज्यकामवर्धनी जयाची चित्तवृत्ति नृपसद्वंशी ॥ ५१॥
रामप्रियाकर पूजादिक करि नित्यहिं नैमित्तिक दिवसीं ॥ ५२॥
रिपुजन गमनश्रमामुळे बहु श्रमुनी होती वनवासी ॥ ५३॥
श्रीविश्वंभरिच्या सुकृपेनें विजय घडे हो रणि ज्याशी ॥ ५४॥
श्यामलाङ्गि महिषासुरमर्दनि प्रसन्न ज्याला अहर्निशी ॥ ५५॥
षण्मुखप्रियापरि नेपालाधिपास दिधला स्वसुतेशी ॥ ५६॥
पट्टराणि सिंहेन्द्र मध्यमा अरिची शरणा चरणाशी ॥ ५७॥
हैमवन्तिनी दुसरी गाते ज्याचे सद्गुण कीर्तीशी ॥ ५८॥
धर्मवती बहु सूक्ष्मबुद्धिचा म्हणति असावा विष्ण्वंशी ॥ ५९॥
नीतिमतीचा राज्य चालवी जनां सौख्यवी बहु हौशी ॥ ५ ॥ ॥ श्री ॥ ॥ ६०॥
ज्याची कान्ता मणिशिवेन्द्रनृपपुत्री राज्य करि चतुर गुणी ॥ ६१॥
पुरुष ऋषभ प्रियाळु जो नृप सार्वभौम कुलराजमणी ॥ ६२॥

कनकलताङ्गी दासि घालि सुममाला देविडि घडि करुनी ॥ ६३॥

वाचस्पतिसम वक्ता जो कीं विद्वांसांसी सन्मानी ॥ ६४॥

स्वीयपतीसीं रमेच कल्याणी श्रीवच्छ्रीगुणखाणी ॥ ६५॥

विचित्राम्बरी कीर्ति जयाची व्यापे शाश्वत दाटोनी ॥ ६६॥

अमित सुचरित्रा चरितासी गाती कविजन कृति करुनी ॥ ६७॥

सुखकर ज्योतिःस्वरूपिणी तनुकान्ति जयाची लसे धरणी ॥ ६८॥

धातुवर्धनी तनुहि असे हा शतायुषी नृप लक्षणी ॥ ६९॥

शुकी नासिका भूषणि भूषित शकुन घडवि करि आर्ति झणी ॥ ७०॥

कोसलाधिप पूर्णकृपेनें लाभे सकलेष्टहिं अवनीं ॥ ७१॥

रसिकप्रिया बाहत्तरमेळाख्या श्रीवेङ्कट शुभवाणी ॥ ६ ॥ ॥ श्री ॥ ॥ ७२॥

स शिवात्मजश्च ऋध्यादीशगणेशो महेशपटुपुत्रः ।
धन्यः सुरामनामान्वितः शिवं दिशतु निगमशास्त्रज्ञः ॥

श्रीवेङ्कटकृपयेदं द्विसप्तमेलाख्यलक्षणं ग्रथितम् ।
वेङ्कटरामबुधेन च वेङ्कटकविना सुमङ्गलं दिशतु ॥

सन् १८८३ ॥ श्रीरस्तु ॥

Encoded by Pallasena Narayanaswami ppnswami gmail.com

Proofread by Pallasena Narayanaswami, Sunder Hattangadi, NA

*72 Melakarta by Shri Venkatakavi*

pdf was typeset on September 16, 2023

Please send corrections to *sanskrit@cheerful.com*